(3)

(प.०,५७)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी     **P.S.(ठाणे):** गंगाखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0556     **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**15/08/2026 19:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिंनाक पासून):** 11/08/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 11/08/2026
   **Time From (वेळेपासून):** 14:13 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 15/08/2026     **Time (वेळ):** 19:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 029

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 15/08/2026 19:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी     **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जुने तहसिल कार्यालय, गंगाखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

(9)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मनिषा संजय पवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, परभण,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, परभण,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823067347

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश त्रंबकराव लटपटे | | | 1. पडेगांव तागंगाखेड ,जिल्हा परभ, गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दि. 15/08/2026.

फिंयाद

मी मनिषा संजय पवार, वय - 42 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, परभणी. मो. नं. 9823067347.

समक्ष पोलीस स्टेशन गंगाखेड, जि. परभणी येथे हजर येवून सरकारतर्फे फिंयादी होवुन फिंयाद देते की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, परभणी युनीट येथे जुन 2025 पासुन पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे. दि. 10/08/2026 रोजी श्री. महेश पाटणकर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., परभणी यांनी आम्हास गंगाखेड येथे जावुन तक्रारदार राजकुमार देशमुख यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करण्याचे आदेशीत केले. त्यावरून आम्ही तात्काळ समाज कल्याण, परभणी येथुन दोन शासकीय पंच नामे 1) श्री. रामप्रसाद भगवानराव वजीर, कनिष्ठ लिपीक व 2) श्री. काषीनाथ पांडुरंग गणगे, सहायक ग्रंथपाल यांना उपलब्ध करून घेतले. आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे गंगाखेड शहराच्या अलीकडे एका शेतात आडोशाचे ठिकाणी खाजगी वाहनाने पोहचलो व तक्रारदार देशमुख यांना फोन लावुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी बोलावुन घेतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास आमची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून देवुन त्यांचे तक्रारी बाबत विचारणा केली. त्यांनी त्यांचे नाव राजकुमार गणपतराव देशमुख, वय - 70 वर्ष, व्यवसाय - शेती, रा. पिंप्रीझोला, ता. गंगाखेड जि. परभणी असे सांगुन त्यांची तक्रार तोंडी कथन करुन लेखी तक्रार दिली की, "मी शेतकरी असुन माझ्या वडिंलाचे निधन झाल्यामुळे मी व माझा भाऊ विलास गणपतराव देशमुख असे दोघांनी वाटणी पत्र तयार करून घेतले आहे. सदर वाटणी पत्राणुसार फेर ओढण्यासाठी दि. 09/07/2026 या दिवशी तलाठी साहेब यांना जुने तहसील कार्यालयामध्ये जावुन भेट घेतली. तलाठी यांनी बॉण्डवरील वाटणी पत्रकानुसार फेर ओढण्यासाठी 25,000/- हजार रूपयाची मागणी केली. माझ्याकडे 5,000/- रूपये आहेत असे म्हणल्यावर तलाठी यांनी तुम्ही तहसीलमध्ये अर्ज देऊन परत माझ्याकडे या असे सांगीतले. त्यानंतर दि. 13/07/2026 रोजी गंगाखेड तहसील मधील आवक-जावक विभागात अर्ज दाखल केला. दि. 10/08/2026 रोज़ी मी तलाठी लटपटे यांना फेर संदर्भात भेटणार आहे. भेटी दरम्यान त्यांनी मला परत पैशाची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी. वगैरे मजकुराची तक्रार दिली. तक्रारदाराची तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री करून तक्रारदाराच्या तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

दि. 11/08/2026 रोजी 14.13 ते 14.31 वाजण्याच्या दरम्यान तक्रारदार देशमुख व पंच क्र. 1 वजीर यांना आवश्यक त्या सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डरसह तलाठी लटपटे यांना भेटण्यासाठी गंगाखेड शहरातील जुने तहसिल कार्यालयात पाठविण्यात आले. सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांची तलाठी लटपटे यांचेसोबत भेट झाली. सदर भेटीमध्ये तक्रारदाराचे कामासंबंधाने चर्चा झाली. सदरवेळी तलाठी लटपटे यांनी त्यांचे समोर बसलेल्या व्यक्तीस उद्देशून " लक्षीमण... नऊ एक्करची वाटणी हय.. हेयला पंचवीस हजार मागितले मी...ते म्हणले पाच हजारात करा..." असे सांगीतले. त्यावर तक्रारदाराने "घरचच भाऊ आलते इथ... भाऊ होते...घरातल भाऊ वाटणी हे" असे सांगीतले. त्यावर तलाठी लटपटे यांनी तक्रारदारास " तुमच काय.. मला काय तुमच म्हणन हे सांगा सरळ" असे म्हणाले. त्यावर तक्रारदाराने " वीस हेत ...वीस हजार... वीस एक हजार देतो...आ..उदया" असे म्हणुन वेळ मागितला. त्यावर तलाठी लटपटे यांनी "आजच देऊन टाका तुम्ही..दया" असे म्हणुन अर्ध्या तासात परत येण्यास सांगुण 20,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. सदर पडताळणी मधील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण आम्ही, तक्रारदार व पंचानी ए◌ैकले. तसेच तक्रारदार व पंचास विचारपुस केली. त्यावरुन तलाठी लटपटे यांनी तक्रारदार यांना 20,000/-रुपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. तलाठी लटपटे

यांनी तक्रारदारास अर्ध्या तासात पैसे घेवुन येण्यास सांगीतले होते. परंतु अर्धा तास होवुन गेल्याने तक्रारदाराने तलाठी लटपटे यांना पंचासमक्ष फोन केला. त्यावेळी तलाठी लटपटे यांनी ते बाहेर गेले असुन आता ते भेटू शकत नसल्याचे सांगून ते कळवतील तेंव्हा भेटा व येताना तहसील मध्ये आवक जावक विभागात दिलेला अर्ज व बॉन्ड घेवून या असे सांगीतले. त्यामुळे तक्रारदार यांचे विंनतीवरुन सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगीत करून तक्रारदार सांगतील त्यादिवशी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 13/08/2026 रोजी सापळा कार्यवाही अनुषंगाने आम्ही तक्रारदार देशमुख यांना दोन्ही पंच व सापळा पथकासह पिंप्रीझोला गावी तक्रारदार यांचे शेतात भेटलो, तेथे तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष आम्हास सांगीतले की, "दिंनाक 12/08/2026 रोजी मला माझे गावातील व गंगाखेड येथील ओळखीच्या लोकांकडुन कळाले की, तलाठी लटपटे यांना माझा संशय आल्याने ते त्यांचे कार्यालयातुन निघुन गेले होते. त्यांनी मला फोनवर ते कळवतील त्यादिवशी येण्यास सांगीतले होते. तसेच अद्याप पावेतो तलाठी लटपटे यांनी मला फोनदेखील केलेला नाही. यावरून तलाठी लटपटे यांना माझा संशय आल्याने ते आता माझेकडून दि. 11/08/2026 रोजी मागणी केल्याप्रमाणे 20,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली आहे. त्यामुळे यापुढे सापळा आयोजीत न करता लाचलुचपत प्रतिंबधक विंभागामाफत पुढील कार्यवाही करण्यात यावी" वगैरे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांचा पंचासमक्ष हस्तलिखीत जबाब घेतला. तसेच शासकीय मोबाईल व्दारे पंचासमक्ष तक्रारदाराचे व्हिडीओ शुटींग केले आहे. त्यामुळे तलाठी लटपटे यांचे विरुध्द सापळा कार्यवाही न करण्याचे ठरविण्यात आले. तसा सविस्तर सापळा स्थगीती पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 10/08/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभागास तक्रारदार राजकुमार देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीवरून दि. 11/08/2026 रोजी 14.13 ते 14.31 वाजण्याच्या दरम्यान जुने तहसिल कार्यालय, गंगाखेड येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक तलाठी लटपटे यांनी तक्रारदार यांचे तहसील कार्यालय, गंगाखेड येथे दिलेल्या प्रलंबीत अर्जावरून तक्रारदाराच्या वाटणीपत्रानुसार तक्रारदाराचे नावाने फेर नोंदवण्यासाठी 20,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून माझी रमेश त्रंबकराव लटपटे, वय 48 वर्ष, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), नेमणूक सजा पडेगांव ता.गंगाखेड ,जिल्हा परभणी अतिरीक्त पदभार सजा झोला, तहसिल कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी, राहणार कोद्री ता. गंगाखेड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये कायदेशीर फिंयाद आहे.

फिंयाद

दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SHRIKANT VENKATRAO DONGARE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**Registered by (**नोंदणी अधिकारी**)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** SHRIKANT VENKATR
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** PI

PI (ACB)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन,गंगाखेड

(४)



**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड़) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जरं तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)